SAMATA SHIKSHAN SANSTHA PUNE-30
Dr.Babasaheb Ambedkar College of Social Work ,Morane
(Nakane)Tal.Dist.Dhule.(M.S) 424002 Phone:9405887289
NAAC Accredited B++ Grade ISO Certified
E-mail:msw_college@rediffmail.com Website.www.drbacsw.org

| CHAIRMAN | SECRETARY | PRINCIPAL |
|---|---|---|
| Prof.Usha Wagh | Prof.Vilas Wagh | Dr. Jalindar Adsule |

Outword No. Date:- / /2022

# ग्रंथालय विभाग

## भारतीय संविधान व्याख्यानमाला सप्ताह

**दिनांक :19/01/2022**

समता शिक्षण संस्था पुणे संचालित डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय मोराने ता. जि. धुळे येथील महाविद्यालयाच्या ग्रंथालयामार्फत शै.वर्ष-2021-22 या वर्षात भारतीय संविधान व्याख्यानमाला सप्ताह कार्यक्रमाचे आयोजन दिनांक -19/01/2022 ते दिनांक -26/01/2022 या कालावधीत दररोज सकाळी ठिक -10:00 वाजता आयोजन करण्यात आले होते.कोविड-19कोरोना या सांसर्गिक आजाराचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी online Google Meeting द्वारे आयोजन करण्यात आले होते.

भारतीय संविधान व्याख्यानमाला सप्ताहाचे उदघाटन महाविद्यालयाचे प्राचार्य व भारतीय संविधान व्याख्यान मालाचे अध्यक्ष डॉ.जालिंदर अडसुळे सर यांनी प्रथम भारतीय संविधान उद्देशिकाचे प्रास्ताविका वाचन करण्यात आले.कार्यक्रमाच्या सुरुवातीला भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मुर्तीस व विचारांना अभिवादन करून सुरुवात करण्यात आली.भारतीय संविधान व्याख्यानमाला कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.जालिंदर अडसुळे सर यांचे ग्रंथपाल गजेंद्र जगदेव यांनी स्वागत केले.तसेच प्रमुख पाहुणे व वक्ते प्रा.विजय पाटील (सभापती पंचायतसमिती जिल्हा परिषद धुळे ),अॅड.राहुल वाघ आणि उपस्थितीत सर्व विद्यार्थी,शिक्षक व शिकेतर कर्मचारी यांचे Google meeting च्या माध्यमातून स्वागत करण्यात आले.

भारतीय संविधान व्याख्यानमाला कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथपाल गजेंद्र जगदेव यांनी करतांना सांगितले की,भारतीय संविधान व्याख्यानमाला सप्ताह या उपक्रमात दिनांक -19/01/2022 पासून ते 26/01/2022 पर्यंत आयोजित केला आहे. या उपक्रमात अनेक तज्ञ

Dr.Babasaheb Ambedkar College of Social Work,Morane,Dhule (M.S.) ★ Samata Shikshan Sanstha, Pune's

वक्ते मार्गदर्शन करणार आहेत.त्यांनी आपल्या प्रास्तविकामध्ये जगात सर्वश्रेष्ठ आपल्या देशाची भारतीय राज्यघटना आहे.भारतीय संविधान तयार करण्याची प्रक्रीया न्याय,समता,स्वातंत्र्य व बंधुता या मुख्य तत्वांवर आपली भारतीय राज्यघटना आधारित आहे.

आजही भारतीय साविधानाबद्दल आपुलकी,प्रेम,बांधिलकी युवकांमध्ये जाणिव जागृती करणे गरजेचे आहे.त्याकरिता अशा व्याख्यानांची आवश्यकता आहे.भारतीय संविधान तयार करण्यासाठी दोन वर्षे अकरा महिने आठरा दिवस लागले आहेत.असे आपल्या प्रास्तविकामधून माहिती विद्यार्थांना दिली.त्यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा.विजय पाटील (सभापती पंचायतसमिती जिल्हा परिषद धुळे ),हे उपस्थित होते.त्यांची प्रकृती ठिक नसल्याने त्यांच्यावतीने अॅड.राहुल वाघ यांनी मनोगत व्यक्त केले.त्यात त्यांनी सांगितले की,संविधान सभेतील कामकाज,मसुदा समिती आपल्या भारतीय राज्यघटना तयार करण्यासाठी 8 प्रमुख समित्या तयार केल्या होत्या.त्यापैकी मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची 29 आगस्ट 1947 रोजी निवड करण्यात आली होती.

या समिती मध्ये 8 सदस्य होते,परंतु डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचेच भारतीय संविधान पूर्ण करण्यासाठीचे महत्वाचे योगदान आहे.असे आपल्या मार्गदर्शनातून सांगितले.भारतीय संविधान व्याख्यान मालाचे अध्यक्ष व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जालिंदर अडसुळे सर यांचे आभार आयोजक महाविद्यालयाचे ग्रंथपाल गजेंद्र जगदेव यांनी मानले.त्यानंतर भारतीय संविधान व्याख्यानमाला उपक्रमाच्या Google meeting मध्ये सहभागी झालेले व्यक्ते व प्रमुख पाहुणे प्रा.विजय पाटील (सभापती पंचायतसमिती जिल्हा परिषद धुळे ), अॅड.राहुल वाघ सर्व विद्यार्थी व शिक्षक कर्मचारी व मान्यवरांचे आभार आयोजक महाविद्यालयाचे ग्रंथपाल गजेंद्र जगदेव यांनी मांनले.

दिनांक:20/01/2022

भारतीय संविधान व्याख्यान माला सप्ताह या उपक्रमात दिनांक -20/01/2022 रोजी सकाळी ठिक -10.00 वाजता गुगल मिटींगच्या माध्यमातून मा.प्रा.डॉ.निशा भंडारे मॅडम यांचे **भारतीय संविधान आणि दुर्बल घटकांचा विकास** या मा.प्रा.डॉ.निशा भंडारे मॅडम यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.प्रथम त्यांचा परिचय महाविद्यालयातील ग्रंथपाल गजेंद्र जगदेव यांनी करून दिला.त्यानंतर त्यांचे महाविद्यालयाच्या वतीने स्वागत करण्यात आले.त्यानंतर त्यांनी विद्यार्थांना मा.प्रा.विलास वाघ सर नेहमी म्हणायचे की,आपण चांगले विचार आत्मसात करावेत आणि हे विचार विद्यार्थीपर्यंत पोह्चावावेत असे बोलायचे.यावरून आज मला त्यांची आठवण झाली.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना शिकलेल्या लोकांनी धोका दिला.दुर्बल घटकांचा विचार केला अनेक वर्षाचा उल्लेख करावा लागेल त्यात मनुस्मृतीचा उल्लेख असा की स्त्रियांनी

Dr. Babasaheb Ambedkar College of Social Work, Morane, Dhule (M.S.) Samata Shikshan Sanstha, Pune's

व अशपृश्यांनी संस्कृत बोलायचे वऐकायचे नाही.पंचवीस डिसेंबर रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मनुस्मृतीं दहनकेले.बाबासाहेबांचे पुस्तकांवर खूप प्रेम होते.परंतु हे पुस्तक दुर्बल घटकांच्या विकासासाठी बाधा आणणारे होते.म्हणूनच त्यांनी प्रथम जाळले असे सांगितले.त्यानंतर शुद्र पूर्वी कोण होते? चातुर्य व्यवस्था यासंदर्भात मार्गदर्शन केले.प्रथम समाज व्यवस्था ,प्रस्थापित करणे,त्यानंतर जातीभेद नष्ट करणे,लोकसहकार्य,उद्योगधंदे सुरु करणे,दुर्बल घटकांचा विकास,राखीव जागा,नौकरीत आरक्षण इत्यादी विषयावर प्रा.डॉ.निशा भंडारे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

तसेच झुममिटींगमध्ये सहभागी झालेल्या मान्यवरांचे आभार आयोजक महाविद्यालयाचे ग्रंथपाल गजेंद्र जगदेव यांनी मानले.सदरकार्यक्रमास विद्यार्थांनी onlineसहभाग नोंदविला होता.

दिनांक:21/01/2022

भारतीय संविधान व्याख्यान माला सप्ताह या उपक्रमात दिनांक:21/01/2022 रोजी सकाळी ठिक;10:00 वाजता गुगल मिटींगच्या माध्यमातून मा.प्रा.डॉ.निशा शिरुरकर- **भारतीय संविधान आणि हिंदू कोड बिल** या मा.प्रा.डॉ.निशा शिवूरकर मॅडम यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.प्रथम त्यांचा परिचय महाविद्यालयातील ग्रंथपाल जगदेव यांनी करून दिला.त्यानंतर त्यांचे महाविद्यालयाच्या वतीने स्वागत करण्यात आले.भारतातील पहिली राज्य घटना ,महात्मा गांधी यांनी 21 जानेवारी 1939 रोजी उभारणीची सुरुवात केली.त्यानंतर 1946 मध्ये व्ही.एन.राव यांच्या अध्यक्षतेखाली पहिली समिती नेमण्यात आली.घटना समितीमध्ये प्रत्येक पक्षामधून सदस्य निवडण्यात आले.शेड्युल कास्ट फेडरेशन मधून भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर बंगाल प्रांतामधून निवडून आले होते.परंतु बंगाल प्रांत वेगळा असल्यामुळे त्यांचा समावेश झाला नाही.

म्हणून बिनविरोध सदस्य म्हणून डॉ.बाबासाहेबांना घटना समितीवर घेण्यात आले होते.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी 1935 मध्ये एक घोषणा केली की मी हिंदू म्हणून जन्माला आलो पण हिंदू म्हणून मरणार नाही.महिलांवर मोठ्या प्रमानात अन्याय व अत्याचार होतात 1926 सतीप्रथा कायदा,1929 बालविवाह कायदा असुन देखील महिलांवर अन्याय होतो.त्यामुळे ते कायदा मंत्री असतांना हिंदू कोड बिल सदर केले.या हिंदू कोड बिलास राष्ट्रपती डॉ.राजेंद्रप्रसाद यांचा कडक विरोध होता.त्यामुळे स्वामी करपात्रे यांनी मोर्चा काढला होता.हृदयनाथ कांजुरू आणि न.वि.गाजरे यांनी लोकसभेमध्ये हिंदू कोड बिलासंबंधी सकारात्मक बाजू माड ण्याचा प्रयत्न केला.कलम सात बाबत दिवसभर चर्चा सुरु होती.यात दुर्गाबाई देशमुख सदस्या होत्या.डॉ.बाबासाहेबांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले की

Dr. Babasaheb Ambedkar College of Social Work Morane Dhule (M.S.) Samata Shikshan Sanstha, Pune's

या बिलाचा उपयोग सर्वच महिला वर्गाला होईल.परंतु बिल मंजूर झाले नाही.तसेच ओबीसी समाजासाठी एक मंडळ आयोग नेमा.असे सांगितले त्यांचे म्हणणे हे सत्ताधारी लोकांना पटत नव्हते.म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी 4 वर्षे एक महिना 26 दिवस कायदे मंत्री म्हणून कार्य केले.शेवटी हिंदू कोड बिल मंजूर न झाल्यामुळे त्यांनी कायदा मंत्री पदाचा राजीनामा दिला होता.भारतरत्नडॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधान मध्ये महिलांना समानतेचा हक्क ,मतदानाचा हक्क बहाल केला आहे.महिलांसाठी कौटुंबिक हिंसाचार ,स्त्रियांवरील अत्याचार कायदेविषयक तरतुदी भारतीय संविधानात नमूद केल्या आहेत.वरीलप्रमाणे विषयावर प्रा.डॉ.निशा शिवूरकर मडमयांनी मार्गदर्शन केले.तसेच झुम मिटिंग मध्ये सहभागी झालेल्या मान्यवरांचे आभार आयोजक महाविद्यालयाचे ग्रंथपाल गजेंद्र जगदेव यांनी मानले.

दिनांक:22/01/2022

भारतीय संविधान व्याख्यान माला सप्ताह या उपक्रमात दिनांक:22/01/ 2022 रोजी ठिक 10:00 वाजता गुगल मिटींगच्या माध्यमातून धुळे न्यायालयातील वकील मा.विशाल साळवे यांना **भारतीय संविधान आणि न्याय व्यवस्था** या विषयावर मार्गदर्शनासाठी आमंत्रित करण्यात आले होते.प्रथम त्यांचे महाविद्यालयाच्या वतीने स्वागत करण्यात आले.सर्व विद्यार्थांना थोडक्यात त्यांचा परिचय करून दिला.त्यानंतरत्यांनी आपल्या मार्गदर्शनांमध्ये सांगितले की भारतीय संविधानाकडे प्रत्येक नागरिकाने सकारात्मक दृष्टीकोनातून पाहिले पाहिजे. त्यांनी केशवानंद भारती यांचा खटला 1980 या संदर्भात मार्गदर्शन केले.या तसेच मुलभूत अधिकार,कलम15 नुसार सर्व लोक कायद्यासमोर समान आहेत.आपल्या जवळ संपत्ती राखणे हा कायदेशीर हक्क आहे.संसद हा अधिकार गोरगरिबांना समान वाटप करू शकते.सामाजिक स्वातंत्र्या शिवाय राजकीय स्वातंत्र फार काळ टिकू शकत नाही.पहिली घटना दुरुस्ती पंडित जवाहरलाल नेहरू यांनी केली होती.जमीनदारी नष्ट करण्यासाठी केशवानंद भारती हा खटला संबंधित होता.शंकरीप्रसाद 1965 केस चा निकाल जास्तीची जमीन जमीनदाराकडूनशासनाने घेणे व त्या जमिनीचे वाटप गोर गरीब लोकांना समान वाटप करणे हा अधिकार संसदेला आहे.तसेच त्यांनी गोलप नाथ याची केस बद्दल माहिती विद्यार्थांना आपल्या व्याख्यानातून दिली.

दिनांक:24/01/2022

भारतीय संविधान व्याख्यान सप्ताह या उपक्रमात दिनांक 24/01/2022 रोजी ठिक 10:00 वाजता गुगल मिटींगच्या माध्यमातून आदिवासी शिक्षण संस्थेचे महिला महाविद्यालय नंदुरबार येथील ग्रंथपाल प्रा.श्रीराम दाउदखाने यांना **भारतीय संविधान आणि स्त्री-पुरुष**

Dr.Babasaheb Ambedkar College of Social Work,Morane,Dhule (M.S.) * Samata Shikshan Sanstha, Pune's

समानता या विषयावर मार्गदर्शनासाठीआमंत्रित करण्यात आले होते.प्रथम त्यांचे महाविद्यालयाच्या वतीने स्वागत करण्यात आले.सर्व विद्यार्थांना थोडक्यात त्यांचा परिचय करून देण्यात आला.

पाचव्या दिवशी मा.(नंदुरबार ,महाविद्यालय महिला कला,ग्रंथपाल )दाऊतखाने श्रीराम सर यांनी भारतीय संविधान आणि स्त्री-पुरुष समानता या विषयावर त्यांनी आपल्या भाषणात त्यांनी आपली संस्कृती पुरुष प्रदान आहे.स्त्रियांना दुय्यम स्थान दिले जाते.कौटुंबिक निर्णयामध्ये सहभागी करून घेतले जात नाही. एकविसाव्या शतकात मानवी हक्कांची जपणूक करण्यासाठी स्त्री पुरुष समानतेला महत्वपूर्ण स्थान दिले ,तरच भावी पिढी या संस्काराचे अनुकरण करेल. स्त्री पुरुष समानता हि या विषयाची जाणीव जागृती करणे, हि काळाची गरज आहे. त्यानंतर भारतीय संविधान घटनेच्या कलम 14 नुसार कायद्यासमोर सर्व समान आहेत. आज समाजाबद्दल अनेक सामाजिक धारणा आहेत. त्यातील अनिष्ट प्रथा वाईट रूढी, परंपरा व रीतीरिवाज आपण दूर करायला पाहिजेत, इतिहास बदलता येतो, त्याकरिता समान हक्क व अधिकार स्त्रियांना मिळवून दिला पाहिजे. पुरुष प्रधान व्यवस्थे मध्ये स्त्रियांना मानाचे स्थान असले पाहिजे. स्त्री देखील या व्यवस्थेमध्ये महत्वाची भूमिका बजावत आहे. प्रत्येक क्षेत्रात स्त्रीयांना महत्व देवून त्यांचे विचार अमंलात आणले पाहिजे.असे त्यांनी सांगितले.

दिनांक:25/01/2022

भारतीय संविधान व्याख्यान सप्ताह या उपक्रमात दिनांक :25/01/2022 रोजी ठिक 10:00 वाजता गुगल मिटींगच्या माध्यमातून सहाव्या दिवशी मा. अॅड. राजु बागुल (प्राध्यापक, विधी महाविद्यालय, पनवेल मुंबई ) यांनी आपल्या भाषणात "भारतीय संविधान आणि उद्देशिकेचे महत्त्व" या विषयावर माहिती देतांना सांगितले की, भारतीय सविधनाचा गाभा म्हणजेच भारतीय संविधानाची उद्देशिका होय. प्रत्येक विद्यार्थांनी भारतीय संविधान वाचले पाहिजे. तसेच भारतीय संविधानाचा अभ्यास करून संविधानाची जनजागृती केली पाहिजे.तसेच 25 जानेवारी मतदान दिवस निमित्ताने सर्वांनी मतदान केले पाहिजे ,असे त्यांनी मत व्यक्त केले.

दिनांक:26/01/2022

भारतीय संविधान व्याख्यान सप्ताह या उपक्रमात दिनांक:26/01/2022 रोजी ठिक 10:00 वाजता गुगल मिटींगच्या माध्यमातून दिनांक :26/01/2022 सातव्या दिवशी भारतीय संविधान व्याख्यान मालेचा अध्यक्षीय समारोप कार्यक्रम मा. प्राचार्य डॉ. जालिंदर अडसुळे सर यांनी आपल्या समारोपीय भाषणात सांगितले की, या व्याख्यानमालेचे आयोजन ग्रंथालय विभागाने चागल्या प्रकारे केले आहे.आणि पुढेही असेच चालू ठेवावे असे सांगितले. या सात

Dr. Babasaheb Ambedkar College of Social Work, Morane, Dhule (M.S.) * Samata Shikshan Sanstha, Pune's

दिवसात भारतीय साविन्धानाच्या विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. त्यांनी भारतीय संविधानाविषयी बोलतांना सांगितले की ,आपल्या देशात विविध जाती धर्माचे लोक राहतात व या सर्वांचे हक्क व अधिकार भारतीय संविधानामुळे अबाधित आहेत. तसेच राज्याराज्यातील मतभेद सुध्दा भारतीय संविधानामुळे एकसंघ आहेत. असे समारोपीय भाषणातून सांगितले.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे ग्रंथपाल गजेंद्र जगदेव सर यांनी केले. तर कार्यक्रमाचे सूत्र संचलन श्री. सुभाष बागुल यांनी केले तसेच श्री विजय आगळे यांनी सर्व उपस्थित विद्यार्थांचे, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे आभार मानले. या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयातील ग्रंथपाल व ग्रंथालय कर्मचारी,गजेंद्र जगदेव , सुभाष बागुल, विजय आगळे यांनी online Google meeting द्वारे केले होते.अशा प्रकारे ग्रंथालयातर्फ भारतीय संविधान व्याख्यान कार्यक्रम राबविण्यात आला.

धन्यवाद!

Dr.Babasaheb Ambedkar College of Social Work,Morane Dhule (M.S.) * Samata Shikshan Sanstha, Pune's

Prof.Dr.Raghunath Mahaja
Acting Principal
Samata Shikshan Sanstha,Pune
Dr.Babasaheb Ambedkar College c
Social Work,Morane,Dhule (M.S.) - 4240